# ठक्कर्सच्या सुवर्णमहोत्सवी मोहिमेचा विनायकदादा पाटील यांच्या हस्ते शुभारंभ




**नाशिक |** स्थावर मालमत्ता विकसन क्षेत्रात ५० वर्षे पूर्ण करणाऱ्या 'ठक्कर्स' समूहाने आपला सुवर्ण महोत्सव काल स्वातंत्र्य दिनाच्या शुभमुहूर्तावर अतिशय आगळ्या वेगळ्या अशा भव्य स्वरूपात आपल्या सर्व साईट्सवर एक लाख झाडे लावण्याच्या 'हरित नाशिक' या मोहिमेचा शुभारंभ करून साजरा केला.

त्र्यंबकरोडवरील 'ठक्कर्स इस्टेट' च्या भव्य प्रांगणात ठक्कर्स समूहातील कर्मचाऱ्यांनी सपत्निक केलेल्या वृक्ष पूजेने लाखात देखणी अशीही मोहीम सुरू करण्यात अली. समूहाचे अध्यक्ष श्री. जितेंद्र ठक्कर यांनी पुढील एक वर्ष हे 'सुवर्ण महोत्सवी आनंद सोहळा वर्ष' म्हणून साजरा करण्याचा तसेच त्या आनंदोत्सव सोहळ्याचे पहिले पाऊल आत्तापर्यंत ४२,००० ग्राहक झाले असून या ग्राहकांच्या कुटुंबातील सदस्यांचा सक्रिय सहभाग घेऊन ही मोहीम आम्ही राबवणार आहोत असे श्री. ठक्कर यांनी यावेळी सांगितले.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलतांना वनाधिपती श्री. विनायकदादा पाटील यांनी कोणते झाड कोठे लावावे? याचा पूर्ण विचार करूनच वृक्ष लागवड करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. झाड मोठे झाल्यानंतर वाढीसाठी पुरेशी जागा नसल्यामुळे ते जर तोडावे लागणार असेल किंवा रस्ता रुंदीकरणाच्या कारणाने ते तोडावे लागणार असेल तर अशा ठिकाणी वृक्ष लावू नयेत. हे सांगतांना नाशिककडून नाशिकरोड कडे जाणाऱ्या रस्त्यावर ब्रिटिशांनी लावलेल्या वडाच्या झाडांचे त्यांनी उदाहरण दिले. कोणत्या जमिनीत कोणते झाड लावावे याचा सुद्धा विचार करणे आवश्यक आहे असेही ते म्हणाले. आजच्या समारंभात ठक्कर कुटुंबियांनी पाहुण्यांना तुळशीचे रोप भेट म्हणून दिले याचा उल्लेख करून त्यांनी झाडाची काळजी कशी घ्यावी हे शिकवणारी तुळस ही 'बालवाडी' आहे अशा शब्दात या रोपाचा गौरव केला. वृक्ष लागवडीसाठी योग्य ते मार्गदर्शन व सहाय्य देवू शकणारी एखादी व्यवस्था असली पाहिजे आणि अशा व्यवस्थेमध्ये वृक्ष लागवडी संदर्भात काही मार्गदर्शन हवे असेल तर ते देण्यास आपण सदैव तयार आहोत असेही श्री. विनायकदादा याप्रसंगी म्हणाले. समाजहितासाठी आपण प्रतिबद्ध अहोत हेच ठक्करांनी या वृक्ष लागवडीच्या मोहिमेतून स्पष्ट केले आहे अशा शब्दांत त्यांनी ठक्करांच्या या मोहीमेचा गौरव केला.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून क्रेडाई नाशिकचे अध्यक्ष श्री. किरण चव्हाण, आमदार श्री. वसंतरावजी गिते, माजी खा. श्री. देविदासजी पिंगळे होते. तसेच नगरसेवक श्री. अशोक मुर्तडक, प्रसिध्द विकासक श्री. नेमीचंद पोदार, ख्यातनाम विधिज्ञ ॲड. एस. एल. देशपांडे तसेच डॉ. काकतकर इत्यादी मान्यवर कार्यक्रमास उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. अंजना जोशी यांनी केले.

दिव्य प्रॉपर्टी
प्रत्येक शनिवारी

दैनिक दिव्य मराठी
नाशिक, शनिवार. १८ ऑगस्ट २०१२